| प्राथमिक आरोग्य केंद्र आंबवली<br>ता.खेड, जि.रत्नागिरी | | |
|---|---|---|
| | | पत्ता:- प्राथमिक आरोग्य केंद्र आंबवली ता.खेड, जि.रत्नागिरी<br>ई मेल :-aambali.khed.rtn@gmail.com |

जा.क्र. प्रा.आ.केंद्र आं/आवि/आस्था-१/आरकेएस/७०/२०२६
प्राथमिक आरोग्य केंद्र आंबवली खेड,

दिनांक-०९.०२.२०२६

# दरपत्रक सुचना

**विषय-प्राथमिक आरोग्य केंद्र आंबवली, ता. खेड, जि. रत्नागिरीराष्ट्रीय अरोग्य अभियान RKSअंतर्गत प्रिंटर खरेदीबाबत...**

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबवली, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे ऑनलाईन व ऑफलाईन कामकाजाकरिता प्रिंटर ची आवश्यकता आहे. सदर खरेदी करण्यासाठी त्यासाठी स्थानिक पातळीवरुन स्थानिक ठेकेदारांकडूनदोन लिफाफा पध्दतीने सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | प्रकार | तपशिल | | आवश्यक संख्या |
|---|---|---|---|---|
| | | Name of Company | Exside, | 1 |
| | 1 | Inveter | Exside Volt-2300 ,singa Battery | |

तरीवरीलप्रमाणे आपणदरपत्रक सादर करणेसाठी इच्छुक असाल तर आपले बाजार भावाचे (**सर्व करासहित**) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक - १६/०२/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.

**लिफाफा १ (तांत्रिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) शॉप अॅक्ट लायसन्स/ व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रझेरॉक्स प्रत.
२) जीएसटी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरिक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.
३) पॅन कार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत.
४)मागील तीन वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न झेरॉक्स प्रत (सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५)

Scanned with OKEN Scanner

लिफाफा २ (आर्थिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -

१) लिफाफा दोन मध्ये सिलबंद दरपत्रक सादर करावे.

सदरचे तांत्रिक व आर्थिक लखोटा स्वतंत्र लखाटयामध्ये सिलबंद करुन वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आंबवली, ता.खेड, जि.रत्नागिरीयांचे नावे कार्यालयीन वेळेत हे दरपत्रक प्रसिध्द झाले पासून अंतिम तारखेपर्यंत कार्यालयात पोहोच होतील असे पाठविण्यात यावेत.

प्राप्त दरपत्रके हि दिनांक १७/०२/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. वैदयकिय अधिकारी , प्रा.आ.केंद्र आंबवली, ता.खेड, जि.रत्नगिरी यांच्या दालनात उघडण्यात येतील. दरपत्रके मंजुर वा नामंजुर करणेचा अधिकार वैदयकिय अधिकारी, प्रा. आ.केंद्र आंबवली,यांनी आपल्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

अटी व शर्ती -

१) साहित्य पुरवठा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेस तो स्विकारला जाणार नाही. पुरविण्यात येणारे साहित्य हे उत्तम दर्जाचे व गुणवत्ता पूर्ण असणे बंधनकारक आहे. तसेच पुरविलेले साहित्याचा दर्जा/गुणवत्ता/स्थिती याबाबतीत भविष्यात कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा दोष उद्‌भवल्यास त्याचे सर्व प्रकारचे निराकरण करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार याची राहील.

२) साहित्य पुरविणेचे दर ( जीएसटीसह) सर्वकरा सहपुरविणेचे आहेत. शासन नियमा नुसार सर्व देयकेही GST Softwareजनरेटेड व HSN कोडसह देणेत यावीत.

३) शासन नियमानुसार वेळोवळी लागू केले जाणारे सर्व प्रकारचे कर आपले देयका मधून कपात करुन देयके अदाकेली जातील. याबाबत कोणतीही तक्रार गाहय धरली जाणार नाही.

४) पुरविलेले साहित्य पुरवठा आदेशनुसार पुरविले आहे किंवा नाही हे वेळोवेळी व जरुरीनुसार तपासून पाहणेचा अधिकार - मा. वैदयकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र आंबवली, ता.खेड यांना राहील. तपासणीमध्ये साहित्य पुरवठा कमी व साहित्याचा दर्जा योग्य नसलेचे आढळून आल्यास ते प्रमाणानुसार तात्काळ देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. याबाबत अडचण आलेस सर्वस्वी जबाबदारी पुरवठादारांची राहील. असे वारंवार निदर्शनास आल्यास निविदा रद्द करण्याबाबत पुढील कारवाई करणेत येईल.

५) पुरवठा आदेशा नुसार साहित्याचा पुरवठा केलेनंतर त्यांचे योग्य ते शासकिय नियमानुसार लेखी बील -वैदयकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र आंबवली, ता. खेड, जि. रत्नागिरी या कार्यालयाकडे सादर करुन ते बील मिळाले नंतर पेमेंट एसएनए प्रणालादवारे एक महिण्याच्या आत आपली खती वर्ग करणेत येतील.

६) परिस्थिती नुसार नियम, अटी व शर्ती कमी/जास्त करणेचा अथवा शिथील करणेचा अधिकार -वैदयकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र आंबवली, ता. खेड, जि. रत्नागिरी यांना राहील.

७) सदर पुरवठा आदेश - दि. ३१.०३.२०२६ पर्यंत लागू असतील. सदर कालावधी पर्यंत साहित्याची नादुरुस्ती अथवा अकार्यशील असलेस सदर दुरुस्तीची जबाबदारी

Scanned with OKEN Scanner

पुरवठादाराची राहील याची नोंद घ्यावी. सदर दुरुस्तीबाबत कोणतीही अतिरिक्त रक्कम दिली जाणार नाही.

८) कोणत्याही एका अथवा सर्व निविदा मंजूर करणे अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. वैदयकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र आंबवली, ता. खेड, जि. रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

९) सदर कामी संपूर्ण पूर्तता करार पत्राप्रमाणे करणेची जबाबदारी पुरवठादार यांची आहे. यामध्ये पुरवठादार यांचेकडून हयगया झालेस त्यामुळे होणारे नुकसानीस व त्याचे भरपाईस पुरवठादार जबबादार असतील.

१०) भविष्यात कोणतेही प्रकारची दरवाढझालेस अगर शासकिय करात बदल झाल्यास सदर पुरवठयास कोणत्याही प्रकारी दरवाढ पुरवठादाराने मागणेची नाही.

११) सदर साहित्याचे दरबाजार भावापेक्षा जास्त आहेत असे आढळल्यास साहित्याचे देयक बाजार भावानुसारच अदा करणेत येईल. याबाबत पुरवठादाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

१२) पुरवठा आदेश मिळाल्यायापासून १ महिन्याच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहील. मुदतीनंतर पुरवठा केल्यास प्रति आठवडा ०.५ टक्के वसुली करणेत येईल.

वैदयकिय अधिकारी
प्रा.आ.केंद्र आंबवली,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

प्रत:-१) नोटीस बोर्ड
२) शासन संकेत स्थळ

Scanned with OKEN Scanner